# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०५ एप्रिल, २०१७ / चैत्र १५, १९३९ ( शके )**

**(१) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री**
**(३) कृषी आणि फलोत्पादन मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

### सातपाटी (ता.जि.पालघर) गावातील खाडीत नौकानयनाच्या मार्गात साचलेला गाळ काढण्याबाबत

**(१) * ७८५१९ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपाटी (ता.जि.पालघर) गावातील खाडीत नौकानयनाच्या मार्गात मोठया प्रमाणात गाळ साचला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाळामुळे मासेमारी नौका खाडीतून समुद्रात जाऊ शकत नसल्याने गाळाच्या चिखलातून २०० मीटर अंतरावरुन बोटीत डिझेल, बर्फ चढविणे व मासळी किनाऱ्यावर उतरविणे मच्छिमारांना गैरसोयीचे होत असल्याने त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणचा गाळ काढण्याबाबत व नुकसानग्रस्त मच्छीमार व्यावसायिकांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

सदर कामे करताना भरतीच्या वेळेला गैरसोय होत नाही परंतु ओहोटीच्या वेळी गैरसोय होते. सद्यस्थितीत सातपाटी येथील गाळ उपसणी करणे या कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिर्केवाडी-वडसर (ता.वेल्हे, जि.पुणे) या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२) * ८१५१९ श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्केवाडी-वडसर (ता.वेल्हे, जि.पुणे) या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने वाहतूक करणे धोकादायक झाल्याने अपघातात जीवित व वित्त हानी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत तसेच रस्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही

प्रश्नांकित रस्ता प्रजिमा १४० असून लांबी ३६.२०० कि.मी. इतकी आहे. या रस्त्यावर अपघाताची, जिवीत व वित्तहानी झाल्याबाबतची कोणतीही नोंद पानशेत पोलिस ठाण्याच्या दप्तरी नाही. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

रस्त्याच्या काही लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**काटोल व नरखेड (जि.नागपूर) तालुक्यात सोयाबीन पिकांच्या झालेल्या नुकसानाची भरपाई मिळण्याबाबत**

**(३) * ८३४०५ डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यात सोयाबीन पिकांचे एकूण खरीप क्षेत्र १९३२१ हेक्टर तर नरखेड तालुक्यात १४१४४ हेक्टर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काटोल व नरखेड तालुक्यातील सोयाबीनच्या एकूण खरीप क्षेत्रापैकी पिवळा मोझॅक या रोगाच्या प्रादुर्भावामुळे ७५ टक्के, अपुऱ्या व खंडीत पावसामुळे २० टक्के क्षेत्र उध्वस्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने काटोल व नरखेड तालुक्यातील सोयाबीन पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) सन २०१६ च्या खरीप हंगामात काटोल तालुक्यात १४७९४ हेक्टर व नरखेड तालुक्यात १२४८४ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पिकाची पेरणी झाली आहे.

(२) व (३) काटोल व नरखेड तालुक्यात नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा किडरोगामुळे पिकाचे नुकसान झालेले नाही.

सोयाबीन पीक दाणे भरण्याचे अवस्थेत असतांना रसशोषक किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ व कृषी विभागामार्फत

स्थानिक वृत्तपत्र, गाव बैठका व प्रत्यक्ष भेट यामार्फत पिवळा मोझॅक रोगाचे नियंत्रणाकरिता मार्गदर्शन करण्यात आले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वणी, मारेगांव व झरीजामणी (जि.यवतमाळ) तालुक्यात रेतीचा अवैध उपसा होत असल्याबाबत**

**(४) * ८४३७६ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी, मारेगांव व झरीजामणी (जि.यवतमाळ) या तालुक्यातील रेतीघाटावरुन शासनाच्या अटी व शर्तीना डावलून दररोज शेकडो ट्रॅक्टर रेतीचा अवैध उपसा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अवैध रेती उपशामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार रेतीचा अवैध उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) सन २०१६-१७ या वर्षाकरीता यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यातील ५, मारेगांव तालुक्यातील ३ व झरीजामणी तालुक्यातील ३ वाळूगटांचा लिलाव झाला असून, संबंधित लिलावधारकाकडून शासनाच्या अटी व शर्ती डावलून रेतीचा अवैध उपसा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले नाही.

तथापि, झरीजामणी तालुक्यातील लिलाव न झालेल्या मौजे दुर्भा या वाळूगटातून अवैध उत्खनन सुरू असल्याचे निदर्शनास आल्यावरून, १८ ट्रॅक्टर मालकांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच सदर ट्रॅक्टर तेलंगणा राज्यातील असल्याने, त्याविरुध्द कारवाई करण्याबाबत उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, आदिलाबाद यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील प्रकल्पग्रस्त**
**शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(५) * ८१४६९ श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील लाल नाला, पोथरा व दिंदोडा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला अद्यापही मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार उक्त शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील लाल नाला प्रकल्प, पोथरा प्रकल्प या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात आलेला आहे.

हिंगणघाट (जि.वर्धा) दिंदोडा प्रकल्प या प्रकल्पातील २६ भूसंपादन प्रकल्पापैकी १५ भूसंपादन प्रकरणातील ३७७ भूधारकांना सन १९९८ ते सन २००४ या कालावधीत मोबदल्याचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित ११ प्रकरणासंदर्भातील कार्यवाही व्यपगत झालेली आहे.

(२) व (३) याबाबत जिल्हाधिकारी, वर्धा यांनी दिनांक ५.११.२०१६ रोजी बैठक आयोजित केली होती. तथापी सदर बैठकीस संपादक संस्थेचे अधिकारी उपस्थित नसल्यामुळे कोणताही निर्णय होऊ शकलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग व पेण (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाटातील गाव व भातशेतीला समुद्राच्या भरतीच्या पाण्यामुळे धोका निर्माण झाल्याबाबत

**(६) * ८१३१२ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग व पेण (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाटातील माणकुळे, बहिरीचापाडा, धेरंड, शहापूर आदी गावांना व भातशेतीला समुद्रातील उधाणाच्या भरतीच्या पाण्याचा नेहमीचाच धोका निर्माण झाला असून उधाणाच्या भरतीचे पाणी अनेक वेळा खारेपाटील गावांमध्ये व भातशेतीमध्ये शिरल्याने गावांचे व भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) ३ हजार १६ हेक्टर शेत जमीन समुद्राच्या उधाणाच्या भरतीच्या पाण्यामुळे कायमचीच नापिक झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागातील अस्तित्वात असलेले बांधबंदिस्त बंधारे फुटले असून अनेक वर्षापासून त्याची दुरूस्ती अथवा बांधबंदिस्त बंधारे बांधण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अलिबाग व पेण (जि.रायगड) तालुक्यातील खारेपाट विभागातील गावांचे व भातशेतीचे नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे,

(२) हे अंशत: खरे आहे,

अलिबाग तालुक्यातील एकूण पाच योजनांचे ११८२ हेक्टर क्षेत्रापैकी १०५० हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे,

(४) मानकुले व बहिरीचापाडा ही गावे मानकुले या शासकीय खारभूमी योजनेमध्ये समाविष्ट आहेत. मानकुले ही योजना मोठया प्रमाणावर कमकुवत झाली असून मानकुले व सोनकोठा हाशिवरे या दोन योजनांचे एकत्रित संपूर्ण नुतनीकरणाचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेच्या प्रक्रियेत आहेत. तसेच धेरंड व धाकटापाडा शहापूर या शासकीय खारभूमी योजनांच्या बांधाच्या सन २०१६ मधील उधाणामुळे

व पुरांमुळे झालेल्या नुकसानीची दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेऊन पूर्ण करण्यात आली असून, पुन:प्रापित क्षेत्र बाधीत होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. तसेच मोठापाडा शहापूर ही खाजगी योजना असल्यामुळे, सदर योजनांचे काम शासनामार्फत केले जात नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वडकी (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथील अवैध वाळू उपशाबाबत**

**(७) * ८४४२३ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडकी (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथील हिरापूर रेती घाटाचा लिलाव झाला असून सदर रेतीघाटावरुन अहोरात्र अवैधरित्या ट्रेझर बोटीच्या व जेसिबी मशिनने रेतीमाफीया रेतीचा उपसा करीत असल्याचे दिनांक २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी रेतीमाफिया दहा ब्रास रेतीची रॉयल्टी भरून शंभर ब्रास रेतीचा उपसा करत असल्याने शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असून याबाबत महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अवैध रेती उपसा करणाऱ्या रेतीमाफियांवर तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) राळेगांव तालुक्यातील मौजे हिरापूर येथील रेतीघाटातील ५३७१ ब्रास वाळूचा लिलाव रू.३२.४३ लाख एवढ्या सर्वोच्च बोलीस मंजूर करण्यात आला असून, संबंधित लिलावधारकाने दि.२२/०३/२०१७ पर्यंत सदर रेतीघाटातून ११५८ ब्रास वाळूचे उत्खनन केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माझगांव (मुंबई) येथील शासनाच्या मालकीच्या भूखंडाची कच्छी लोहाना निवासी ट्रस्टने बेकायदा विक्री केल्याबाबत**

**(८) * ७७१६० श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगांव (मुंबई) येथील शासनाच्या मालकीच्या २०० कोटी रुपये किंमतीच्या भूखंडाची कच्छी लोहाना निवासी ट्रस्टने एका विकासकाला केवळ साडेतीने कोटी रुपयांमध्ये शासनाची पूर्व परवानगी न घेता बेकायदा विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी शासनास पाठविलेल्या अहवालात भूखंड परत घेऊन ट्रस्टच्या विश्वस्तांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली असून त्यानुसार भायखळा पोलिसांनी विकासकाविरुध्द गुन्हा दाखल केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर भूखंड परत घेण्याबाबत व ट्रस्टच्या विश्वस्तांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) माझगांव येथील नवीन सर्व्हे नं.२/३६०५ मधील शासकीय जमीन भाडेपट्टाकराराने दि.१.९.१९०३ पासून दि वुमेन्स फॉरेन मिशनरी सोसायटी ऑफ दि मेथॉडीस्ट ऑपिस्कोपल चर्च यांना ९९ वर्षांकरीता भाडेपट्टयाने देण्यात आलेली होती. सदर जमीन दि.२३.८.१९१८ रोजी दि वुमेन्स फॉरेन मिशनरी सोसायटी ऑफ दि मेथॉडीस्ट ऑपिस्कोपल चर्च यांनी श्री. कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांना भाडेकराराद्वारे (Deed of Assignment) दिली. त्याच दिवशी एका स्वतंत्र खरेदीखताद्वारे उक्त सोसायटीने नवीन सर्व्हे क्र. १/३६०५ व ३/३६०५ हे भूखंड देखिल श्री.कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्ट यांना

विकले. नगर भूमापनाच्यावेळी उक्त नवीन सर्व्हे क्र.२/३६०५ याचे सर्व्हे क्र.१/३६०५ व ३/३६०५ यांच्यासह रुपांतरण भूकर क्र.१२६ मध्ये झाले व श्री. कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांनी सदर भूकर क्र. १२६ मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांना दि.२४.५.२०१० च्या खरेदी खताने विकल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यावेळी मुळ सर्व्हे नं.२/३६०५ याची भाडेपट्टयाची मुदत संपलेली होती.

(२), (३), (४) व (५) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयाकडून श्री. कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट व मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांचे विरुद्ध भायखळा पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद केलेला आहे.

-----------------

**शिरवळ (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील सर्व्हिस रोडचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(९) * ८४५२० श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरवळ, (ता.खंडाळा, जि.सातारा) येथील पुणे-सातारा रस्त्यावरील (एमएच-४) शिर्के कंपनी ते पंढरपूर फाटा या दरम्यानच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या सर्व्हिस रोडचे काम अपूर्ण असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या सर्व्हिस रोडचे काम पूर्ण करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी गत ७ ते ८ वर्षापासून मागणी करुन व मोर्चे काढूनसुद्धा सदर सर्व्हिस रोडचे काम अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर ठिकाणच्या सर्व्हिस रोडचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत असलेल्या पुणे ते सातारा राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या प्रकल्पामध्ये शिर्के कंपनी ते पंढरपूर फाटा हया ४ कि.मी. लांबीमध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या सेवा रस्त्याच्या बांधकामाचा समावेश आहे. एकूण ८.०० कि.मी. सेवा रस्त्यांपैकी ४.५८ कि.मी.चे बांधकाम पूर्ण झालेले असून ०.७२ कि.मी. चे काम प्रगतीत आहे.

उर्वरित २.७ कि.मी. सेवा रस्त्याचे काम हाती घेण्यात येत असून ते लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना सवलतकाराला देण्यात आल्या आहेत,

तसेच शिर्के कंपनी ते पंढरपूर फाटा हया भागामध्ये सन २०१५ मध्ये ३ व सन २०१६ मध्ये ४ अपघात झाल्याची नोंद असून सदरील अपघात सेवा रस्त्यांच्या अपूर्ण कामामुळे झाले नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्हयातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(१०) * ८३००० डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील शासनाने दुष्काळ जाहीर केलेल्या गावातील १ लाख ९८ हजार शेतकऱ्यांना १०९ कोटी ३६ लाख ५९ हजार १५० रुपयांची मदत अद्यापपर्यंत शासनाने दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोयाबीन व कापूस उत्पादक दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना या वर्षी पेरणी करण्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मदतीची रक्कम न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, दुष्काळ जाहीर केलेल्या गावातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) खरीप २०१५ मध्ये बाधीत झालेल्या कापूस व सोयाबीन या पीकांच्या नुकसानीकरिता अमरावती जिल्हयासाठी एकूण रु.१०९.३६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील हॉटेल्सनी करमणूक शुल्क न भरल्याबाबत**

**(११) * ७७८४५ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील अनेक तारांकित व अतारांकित हॉटेल्सनी गत अनेक महिन्यापासुन करमणूक शुल्क शासनाकडे भरला नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातील ज्या हॉटेल्समध्ये वाद्य व संगीत कार्यक्रम आयोजीत केले जातात त्या हॉटेल्सनी ५० हजार रूपये प्रति माह करमणूक शुल्क भरणे अनिवार्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने करमणूक शुल्क न भरणाऱ्या हॉटेल्सवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतूदींनूसार राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रामध्ये स्थित असलेल्या वाद्यवृदांसह मद्यालयांवर रु.५०,०००/- प्रति माह व उर्वरित क्षेत्रामध्ये स्थित असलेल्या वाद्यवृदांसह मद्यालयांवर रु.२५,०००/- प्रति माह याप्रमाणे करमणूक शुल्क आकारण्यात येतो.

त्यानुसार, नागपूर महानगरपालिका क्षेत्रामधील वाद्यवृंदासह मद्यालय असलेल्या एकूण आठ हॉटेल्सपैकी दोन हॉटेल्स हे उक्त तरतूदींनूसार देय होणाऱ्या करमणूक शुल्काचा नियमीत भरणा शासनाकडे करीत असून उर्वरित सहा हॉटेल्सकडून देय होणाऱ्या करमणूक शुल्काची थकित रक्कम जिल्हाधिकारी, नागपूर यांचेद्वारे महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतूदींनूसार वसूल करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**कौढर काळसूर-श्रृंगारतळी (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) रस्त्यावरील नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(१२) * ८३९४४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौढर काळसूर-श्रृंगारतळी (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) या मुख्य रस्त्यावरील गुरववाडी येथील नदीवर असलेली फरशी खचल्यामुळे प्रवास करताना नागरिकांच्या जिवितास धोका संभवण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पुलाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध व्हावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून सदर पुलाच्या बांधकामास निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) व (४) प्रश्नाधीन पूल हा ग्रामीण मार्ग-२० या जिल्हास्तरीय रस्त्यावरील असून सदरचा रस्ता देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचे अखत्यारित आहे. प्रश्नाधीन पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**गोंदिया जिह्यातील नैसर्गिक आपदग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(१३) * ८०४४२ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिह्यातील देवरी, सालेकसा, आमगाव व सडक-अर्जुनी या तालुक्यात नैसर्गिक आपत्तीमुळे सन २०१६-१७ मध्ये ८ हजार ६५ घरांचे आणि १ हजार २६४ गोठ्यांचे नुकसान झालेल्या ९३३४ आपदग्रस्तांसाठी २ कोटी ७० लाख २१

हजार ५०० रुपयांची आर्थिक मदतीची मागणी शासनाकडे करूनही अद्यापही शासनाकडून आपदग्रस्तांना मदत मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) गोंदिया जिल्हयातील देवरी, सालेकसा, आमगाव व सडक-अर्जुनी तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे सन २०१६-१७ मध्ये ८ हजार ६५ घरांचे आणि १ हजार २६४ गोठ्यांचे नुकसान झालेल्या ९३३४ आपदग्रस्तांसाठी २ कोटी ७० लाख २१ हजार ५०० रुपयांची शासनाकडे आर्थिक मदतीची मागणी जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी केली आहे. नैसर्गिक आपत्तीच्या निकषामध्ये वादळी वारा यासाठी मदत अनुज्ञेय नसल्यामुळे मंत्रिमंडळ उप समितीच्या दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार रुपये २.७० कोटी एवढी विशेष मदत उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चाळीसगाव (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील काली घाटाच्या कामाबाबत**

**(१४) * ८४२६२ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ वरील कन्नड ऊर्फ काली घाटाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे नागरिकांनी उक्त कामाची चौकशी करुन संबंधित ठेकेदाराविरोधात कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदारांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेमार्फत औरंगाबाद ते धुळे ह्या राष्ट्रीय महामार्गाच्या डांबरी नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून त्यामध्ये कन्नड/काली घाटातील रस्त्याच्या नुतनीकरणाचे काम पूर्ण केले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) तालुक्यात अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(१५) * ८४६८५ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात वाळू उपशाचे लिलाव करण्यात आले नसल्याने दौंड व भिगवण भागातून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) पुणे जिल्ह्यात सन २०१६-१७ या वर्षाकरीता ऑक्टोबर, २०१६ मध्ये केलेल्या लिलावात व त्यानंतर केलेल्या फेरलिलावात एकूण ८ वाळूगटांचा लिलाव झाला आहे. त्यामध्ये दौंड तालुक्यातील ५ वाळूगटांचा समावेश आहे.

दौंड तालुक्यात तसेच इंदापूर तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी दक्षता पथके गठीत करण्यात आली असून, सदर पथकांनी केलेल्या तपासणीत वाळूच्या अवैध वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आलेली आहेत. त्यानुसार एप्रिल, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत दौंड तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीच्या ३५२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून रू. २,३६,९६,१८४/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली असून, ३९ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. इंदापूर तालुक्यात वाळूच्या अवैध वाहतुकीच्या ५१ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून रू. ४२,७२,१२०/- एवढा दंड शासनजमा करण्यात आला असून, ५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. तसेच वाळूच्या अवैध वाहतूक प्रकरणी १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक विभागातील महसूल विभागाच्या २७ अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत

**(१६) * ७७८४८ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागातील महसूल विभागाच्या २७ अधिकाऱ्यांविरुद्ध केलेल्या तक्रारींची चौकशी करण्याचे आदेश महसूल विभागाच्या सचिवांनी माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्तांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशांच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील नवीन अविभाज्य शर्तीच्या भोगवटदार वर्ग-२ जमिनीचा नजराणा न भरता नियमबाह्य खरेदी-विक्री झाल्याच्या प्रकरणात महसूल विभागातील ११अधिकारी/कर्मचारी यांच्यासह काही खाजगी व्यक्ती अशा एकूण २३ व्यक्तींविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याचबरोबर नाशिक जिल्ह्याच्या नांदगाव तालुक्यातील २० गावामध्ये नवीन अविभाज्य शर्तीच्या भोगवटदार वर्ग-२ जमिनीचा विहित नजराणा भरुन न घेता नियमबाह्य खरेदी-विक्रीस अनाधिकाराने परवानगी देण्याची अनियमितता केल्याचे निदर्शनास आल्यामुळे तत्का.तहसीलदार नांदगाव यांच्याविरुद्ध दि.१६.०३.२०१६ रोजीच्या ज्ञापनान्वये शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील पारोळा-अमळनेर, पारोळा-भडगांव या रस्त्यासह अनेक रस्ते सहा महिन्यात नादुरुस्त झाल्याबाबत

**(१७) * ७७४०० डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील पारोळा-अमळनेर, पारोळा-भडगांव या रस्त्यासह अनेक रस्ते बांधकाम केल्यानंतर सहा महिन्यात नादुरुस्त झाले असून या रस्त्यांवर खड्डे पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित ठेकेदारावर तसेच कामाच्यावेळी कामाच्या दर्जाची पाहणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सुचना मा.पालकमंत्री यांनी दिल्या होत्या परंतु संबंधितावर अद्यापपावेतो कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदारावर तसेच कामाच्या दर्जाची पाहणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्त्यावर करण्यात आलेली कामे निविदेतील तरतूदीप्रमाणे पूर्ण करण्यात आली आहेत व कामे सुस्थितीत आहेत.

सद्य:स्थितीत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरण्यात आले आहेत. रस्त्यावरून वाहतूक सुरळीत चालू आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पिक व मलवाडा (ता.वाडा, जि.पालघर) या गावातील**
**पिंजाल नदीच्या पात्रातील अवैध वाळू उपसा**

**(१८) * ७६८२० श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिक व मलवाडा (ता.वाडा, जि.पालघर) या गावांच्या हद्दीतील पिंजाल या नदीपात्रातून वाळू माफियांकडून महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून अवैधपणे वाळू उपसा सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशामुळे नदीच्या नैसर्गिक वळणांना बाधा पोहचत असल्यामुळे पुराचा धोका संभवून नदीचे नैसर्गिक सौंदर्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार अवैध वाळू उपसा करून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविणाऱ्यांवर तसेच त्यास मदत करणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे पिक (ता. वाडा) येथील ग्रामस्थांचे दि.३/०१/२०१७ रोजीचे वाडा व मलवाडा गावाच्या हद्दीतील पिंजाळ नदीतील अनधिकृत रेती उपसा रोखण्याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी पालघर यांना प्राप्त झाले होते. तसेच याच विषयाबाबत दि.०३/०१/२०१७ रोजी एका

वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. सदर निवेदनाच्या / बातमीच्या अनुषंगाने वाडा व विक्रमगड तहसिल कार्यालयाच्या संयुक्त पथकाकडून पिक व मलवाडा हद्दीतील पिंजाळ नदीपात्रात दि. १७/०२/२०१७ रोजी तपासणी करून रेती उपसा करणाऱ्या आठ पत्राहोडी पकडण्यात आल्या आहेत.

पिंजाळ नदीतील अनधिकृत रेती उपशामुळे नदीच्या नैसर्गिक वळणांना बाधा पोहचून पुराचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मानोरा (जि.वाशिम) तालुक्यातील आडण प्रकल्पातील पुनर्वसित गावांमध्ये मुलभूत सुविधा देण्याबाबत

**(१९) * ८२४११ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानोरा (जि.वाशिम) तालुक्यातील आडण प्रकल्पासाठी घोटी, वाघोला, म्हसणी, तोरणाला आणि दिघी या पाच गावांचे पुनर्वसन करण्यात आले असुन अद्यापही या गावांमध्ये मुलभूत सुविधा देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तदनुसार आडण प्रकल्पातील पुनर्वसीत गावांमध्ये मुलभूत सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर प्रकल्प १९७६ पूर्वीचा असल्याने त्या वेळी १३ नागरी सुविधा पुरविण्यात आलेले असून, त्या जिल्हापरिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुर्नवसन अधिनियम १९९९ नुसार १८ नागरी सुविधा पुरविण्याबाबत तरतुद असल्याने नमूद ५ गावात उर्वरित ५ नागरी सुविधा पुरविण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोसेखुर्द (जि.भंडारा) प्रकल्पग्रस्तांना नागरी सुविधा व आर्थिक मदत देण्याबाबत**

**(२०) * ८१९९४ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसेखुर्द प्रकल्पामुळे भंडारा जिल्ह्यातील ३४ गावाचे पुनर्वसन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसनाच्या नवीन गावठाणात १८ नागरी सुविधांचा अभाव असल्याने प्रकल्पग्रस्त अद्यापपर्यंत गावठाणात राहावयास गेले नसल्यामुळे धरणाच्या कामात अडथळा निर्माण झाला असून पाणी साठविण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोसेखुर्द प्रकल्पबाधित गावांकरिता १२०० कोटी रूपयांचे पॅकेज देण्यात आले आहे परंतु काही कुटुंबाना अद्यापपर्यंत वाढीव पॅकेज व भूखंड देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पबाधीत कुटुंबाना भूखंड व नोकरी ऐवजी २ लक्ष ९० हजार रुपयाचे पॅकेज देण्याबाबत व सदरहू पुनर्वसनाच्या नवीन गावठाणात १८ नागरी सुविधांचे कामकाज पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अशत: खरे आहे.

बाधीत ३४ गावापैकी २८ गावांचे पुनर्वसन करण्यात आले असून, या २८ बाधीत गावठाणांचे २३ पर्यायी गावठाणात पुनर्वसन करण्यात आले आहे. उर्वरीत ६ गावांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

धरणाचे बांधकाम पुर्ण झाले असून पाणी साठविण्यास भंडारा जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांची अडचण नाही.

(३) व (४) वाढीव कुटूंबांना नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम रुपये २.९० लक्ष देण्याबाबत मान्यता देण्यात आली असून पात्र कुटूंबांना उपरोक्त रक्कम शासन निर्णय दि.१९.०६.२०१३ नुसार स्थापित विशेष कक्षाद्वारे वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

२३ पुर्नवसित गावठाणात मंजुर अभिन्यास व महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुर्नवसन अधिनियमाचे कलम १० (३) प्रमाणे नागरी सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. तथापि दर्जेदार पुर्नवसन करण्याच्या दृष्टीने रु. २५७.६५ कोटी इतक्या खर्चास विशेष बाब म्हणून दि.२९.०८.२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी व सातारा जिल्हयांना जोडणाऱ्या निवळी-नेदरवाडी घाटाच्या कामाबाबत**

**(२१) * ७५९७९ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयाला सातारा जिल्हयाशी जोडणाऱ्या निवळी-नेदरवाडी घाटातील रस्त्याच्या कामास सन १९९९ मध्ये मंजूरी देऊन सदरहू कामाचे भूमीपूजनही करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घाट रस्त्याने एकमेकांशी जोडल्यामुळे रत्नागिरी जिल्हा सातारा जिल्हयापासून ७० ते ८० कि.मी. जवळ येणार आहे तरीही सदर घाटाचे काम अद्यापी सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घाटातील रस्त्याचे काम रखडण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त घाटातील रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून घाट वाहतूकीसाठी लवकरात लवकर कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय
(३), (४) व (५) राष्ट्रीय महामार्ग क्र.४ कराड-ढेबेवाडी-सणबूर-महिंद्र-नाटोशी-मोरगीरी-पाचणी ते नेरदवाडी-नायरी संगमेश्वर-प्रजिमा-५५ रस्ता केंद्र शासनाच्या दि.३.१.२०१७ च्या अधिसूचनेन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ई असा घोषित करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत संगमेश्वर येथून कराड, सातारा येथे जाण्यासाठी कुंभार्ली घाट व आंबा घाट अस्तित्वात असून यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

-----------------

**चित्रपट अभिनेत्यांनी निर्मात्यांबरोबर केलेले करार नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडे नोंदविले जात नसल्याबाबत**

**(२२) * ७४३६० श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील चित्रपट अभिनेत्यांनी निर्मात्यांबरोबर केलेले करार नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडे नोंदविले जात नसल्याने व त्यापोटी मुद्रांक शुल्क भरले जात नसल्याने शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाचा महसुल बुडविणाऱ्या चित्रपट निर्मात्यांच्या कंपन्यांवर व या कंपन्यांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नोंदणी अधिनियम १९०८ च्या कलम १८ मधील तरतूदीनुसार चित्रपट अभिनेत्यांनी निर्मात्यांबरोबर केलेल्या करारांची नोंदणी सक्तीची नाही मात्र अशा करारांवर विहित दराने मुद्रांक भरणे क्रमप्राप्त आहे.

शासनाने मुद्रांक व नोंदणी विभागामध्ये चुकविलेल्या मुद्रांकाचा शोध व वसुली करणे याकरिता बृहन्मुंबई मध्ये मुद्रांक जिल्हाधिकारी, अंमलबजावणी-१ व अंमलबजावणी-२ अशी दोन पदे निर्माण केली असून या दोन अधिकाऱ्यांच्या पथकाकडून विविध संस्था, कंपन्या, शासकीय, निमशासकीय कार्यालये, सोसायटया यांचेकडे होणाऱ्या दस्तऐवजामध्ये मुद्रांक शुल्क बुडविले आहे किंवा कसे याचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. या कार्यवाही अंतर्गत मुद्रांक जिल्हाधिकारी अंमलबजावणी-१ व अंमलबजावणी-२ या कार्यालयांतर्फे दस्तऐवज व इतर कागदपत्रे सादर करण्याकरिता संबंधितांना नोटीसा बजावण्यात येतात आणि मुद्रांक शुल्क चुकविलेले आढळून आल्यास त्याची वसुलीची कार्यवाही नियमानुसार करण्यात येते. याप्रमाणे कार्यवाही करीत असताना चित्रपटसृष्टीमधील संबंधित कंपन्यांना नोटीसा पाठवून करारपत्राच्या प्रती सादर करण्यास कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने प्राप्त दस्तांची पडताळणी करुन

मुद्रांक शुल्क कमी भरल्याचे आढळल्यास नियमानुसार वसुलीची कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पिंपळनेर-नवेनगर-पुन्याचापाडा-कुत्तरखांब ते रोहड या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२३) * ७७८९१ श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पिंपळनेर-नवेनगर-पुन्याचापाडा-कुत्तरखांब ते रोहड हा १८ कि.मी. लांबीचा रस्ता नादुरुस्त झाल्यामुळे सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत नागरीकांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरवस्थेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशंत: खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्ते इजिमा ६२, इजिमा २८ व इजिमा ५९ चे भाग आहेत. या रस्त्याची लांबी अनुक्रमे ८ कि.मी., ४ कि.मी. व ४ कि.मी. आहे. एकूण लांबी १६ कि.मी. आहे. सर्व रस्ते जि.प. धुळे यांच्या अखत्यारीत दुरूस्ती व देखभालीसाठी आहेत. रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग काही लांबीत क्षतिग्रस्त झाला आहे. या रस्त्यांच्या लांबीपैकी ४.१० कि.मी. लांबीतील रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर असून हाती घेण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरून रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्याची कार्यवाही जि.प. धुळे यांच्या मार्फत प्रगतीत आहे.

रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीतील आवश्यक मजबूतीकरण व डांबरीकरणाची कामे मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**खिरोदा-चिनावल-वडगाव-निंभोरा-बालवाडी (रामा-४६) (जि.जळगाव) या रस्त्याच्या झालेल्या दुरवस्थेबाबत**

**(२४) * ७७८३५ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खिरोदा-चिनावल-वडगाव-निंभोरा-बलवडी (रामा-४६) (जि.जळगाव) या रस्त्याची दुरवस्था झाली असल्यामुळे सदर रस्ता वाहतुकीस धोकादायक झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गाच्या दुरवस्थेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नांकित रस्ता रामा ४६ आहे. रस्त्याची लांबी १४ किमी आहे. रस्त्याच्या लांबीपैकी काही भागात रस्ता मोठया प्रमाणात क्षतिग्रस्त झाला आहे. रस्त्यावरील १ पेव्हडीपही क्षतिग्रस्त झाली आहे. उर्वरीत लांबीतील रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्यात आले आहेत. रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे.

(२), (३) व (४) रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम व नादुरूस्त पेव्हडीप दुरुस्तीचे काम मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**बुलढाणा जिल्ह्यात अवैध मासेमारी व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(२५) * ८१५६८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील तलाव, धरणावरील मासेमारी कंत्राट संपुष्टात आले असून तेथील मासेमारीच्या निविदा प्रक्रियेवर स्थगिती असतानाही संबंधीत विभागाच्या दुर्लक्षीतपणामुळे धरण, तलावावर प्रचंड प्रमाणात अवैध मासेमारी

व्यवसाय सुरु असल्याचे व त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तदनुसार अवैध मासेमारीस आळा घालण्याबाबत व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१), (२) व (३) हे खरे नाही. सुधारीत तलाव ठेका धोरण निश्चित होईपर्यंत शासनाच्या यापुर्वीच्या दि.२६.०६.२०१४ रोजीच्या शासन निर्णयात दिलेल्या स्थगिती कालावधीत बुलढ़ाणा जिल्ह्यातील तलाव परिसरातील क्रियाशील मच्छिमारांच्या मागणीनुसार शासनाने एकूण २१९ मच्छिमारांना मासेमारी परवाने दिले आहेत. तसेच, याप्रकरणी तलावावर प्रचंड प्रमाणात अवैध मासेमारी सुरु असल्याच्या तक्रारी तथा निवेदन प्राप्त झालेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माजगाव-पोर्ले (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) यादरम्यानच्या कासारी नदीवरील पुलाची उंची वाढविण्याबाबत

**(२६) * ७६४८८ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजगाव-पोर्ले (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) यादरम्यानच्या कासारी नदीवरील पुल पन्हाळा पश्चिम व पूर्व भागाला जोडणारा तसेच रत्नागिरी राज्य मार्गाला जोडणारा अत्यंत महत्वाचा पूल आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची उंची कमी असल्यामुळे पूल पावसाळ्यात वारंवार पाण्याखाली जातो त्यामुळे तेथील २० ते २५ गावाच्या ग्रामस्थांसह प्रवाशांची गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाची उंची वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) प्रश्नांकित पूल पूररेषेखालील पध्दतीचा (Submerssible) आहे. पूल महत्तम पूराच्यावेळी पाण्याखाली जाऊन वाहतूक खंडीत होते. परंतू वाहतूक खंडीत होण्याचा कालावधी भारतीय रस्ते महासभेने प्रसिध्द केलेल्या विर्निदेशानुसार अनुज्ञेय आहे.
पूल सुरक्षित असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## सिंधुदूर्ग जिल्हयात आंबा व काजू पिकावर भुरी व चुरडा-मूरडा या रोगांच्या प्रादुर्भावाची शक्यता असल्याबाबत

**(२७) * ८४१९८ श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधूदुर्ग जिल्हयात थंडी व दाट धुक्यामुळे काजू व आंबा पिकावर परिणाम होऊन काजू कलम व आंब्याच्या झाडावर आलेली फुले काळसर पडत असून नविन आलेली लहान फळे गळून पडली असल्यामुळे भुरी, चूरडा-मूरडा या रोगांच्या प्रादुर्भावाची शक्यता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, या जिल्हयात मिर्चीचेही उत्पादन मोठ्या प्रमाणात घेण्यात येत असून मिर्ची पिकावर रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## पिराची कुरोली, वाडी कुरोली व चिंचणी (ता.पंढरपुर, जि.सोलापूर) येथे पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान

**(२८) * ७६८०५ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर (जि.सोलापूर) तालुक्यातील पिराची कुरोली, वाडी कुरोली व चिंचणी यासह काही भागामध्ये सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पिराची कुरोली (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील श्री. उध्दव कौलगे या शेतकऱ्याने जमीन विकून शेडनेट उभे केले होते, या शेडनेटमधील काकडी, ढोबळी मिरची व वांगी ही पिके पावसामुळे संपूर्णपणे उध्वस्त झालेली असून त्याचे पंचनामे करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार संबधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी पंचनामे करण्याची मागणी केली, हे खरे आहे.

(३) व (४) कृषि सहायक, तलाठी व ग्रामसवेक यांनी संयुक्त पाहणी केली असून कोणतेही नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे धोंडेगांव (ता.जि.नाशिक) येथील धरणग्रस्त आदिवासींना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(२९) * ८२५२० श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धोंडेगांव (ता.जि.नाशिक) येथे सुमारे २५ वर्षापूर्वी कश्यपी नदीवर धरण बांधण्यात आले असून या धरणासाठी धोंडेगाव, देवरगांव, कश्यपी नगर व गाळोशी या गावातील आदिवासींच्या जमिनी शासनाने संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणग्रस्त आदिवासींना जमिनीचा मोबदला अद्याप मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार उक्त धरणग्रस्तांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) मूळ निवाड्याप्रमाणे मोबदला वाटप करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भडगांव (जि.जळगांव) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम देण्याबाबत

**(३०) * ७७३८७ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगांव (जि.जळगांव) तालुक्यातील शेतकऱ्यांनी राष्ट्रीयकृत, निमराष्ट्रीयकृत व जिल्हा बँकांकडून बागायती पिकांवर हवामान आधारित पीकविमा मुदतीपूर्वी काढला असून त्याचा लाभ अद्याप शेतकऱ्यांना मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲग्रीकल्चर इन्सुरन्स कंपनी ऑफ इंडियाने काही शेतकऱ्यांना हवामान अंदाजानुसार (सर्कलनुसार) पिकविम्याची रक्कम दिली व काही शेतकऱ्यांना अद्याप पीकविम्याची रक्कम दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) हे खरे नाही.

हवामान आधारीत पीक विमा योजनेतंर्गत भारतीय कृषी पीक विमा कंपनी मार्फत सन २०१५-१६ मधील आंबिया बहार हंगामात भडगाव तालुक्यातील १४११ शेतक-यांनी केळी पिकाचा विमा केलेला होता. योजनेच्या तरतुदीनुसार नुकसान भरपाईस पात्र ३९९ शेतक-यांची रक्कम रु.५३.१९ लाख संबंधित शेतकऱ्यांच्या बँकांच्या खात्यावर दि.१० ते १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी जमा करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अट्रावल ते भालोद (जि.जळगाव) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत**

**(३१) * ८१०४२ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल-अट्रावल-भालोद-आमोदा (जि.जळगाव) रस्त्याच्या प्रजिमा-११ किमी.४३/०० ते ४५/०० (भाग-अट्रावल ते भालोद) या रस्त्याचे काम अत्यंत नित्कृष्ट दर्जाचे केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी रस्त्याच्या कामाबाबत कंत्राटदारास सूचना करुनही कंत्राटदाराने दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू रस्ता दुरुस्त करण्याबाबत व निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे कामापैकी सद्य:स्थितीत २० मिमी जाडीचे कारपेट व ७५ मिमी बीबीएम काम पूर्ण करण्यात आले असून कामाची क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी वेळोवेळी पाहणी केलेली

आहे. तसेच रस्ते बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची चाचणी वेळोवेळी करण्यात आली असून ते मानकाप्रमाणे असल्याचे आढळले आहे.
(३) व (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील नदीकाठची शेतमळी वाहून गेल्याबाबत

**(३२) * ७६४९४ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात अनेक ठिकाणी एकच गटात वारंवार वाळू उपशासाठी परवानगी दिल्याने विविध ठिकाणच्या नदीकाठची शेतमळी वाहून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळू ठेकेदारांनी उक्त ठिकाणच्या नदीपात्रात जिलेटीन स्फ़ोट केल्याने तसेच बाज या यांत्रिक बोटीने वाळू उपसा केल्याने नदीच्या पात्राची खोली वाढून पात्रालगतची शेतमळी वाहून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणची शेतमळी वाहून जाऊ नये म्हणून उपाययोजना करण्याबाबत व वाहून गेलेल्या पिकांची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) सदर बाबी निदर्शनास आलेल्या नाहीत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डिंगणे (ता.सावंतवाडी, जि.सिंधूदुर्ग) गावातील डोंगरावर लागलेल्या आगीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(३३) * ८४२८० श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिंगणे (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) गावातील डोंगरावर सुमारे ५०० एकरपेक्षा जास्त क्षेत्राला दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीत धनगर वस्तीवरील सुमारे ९५ शेळ्या मृत्यूमुखी पडल्या व आंबा, काजू या पिकांसह सागवानाची झाडे जळून शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार आपदग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर आगीमध्ये एकूण ६० शेळ्या व १० बोकड मृत झालेल्या आहेत. तथापि दि.१३.५.२०१५ च्या शासन निर्णयानुसार ३० छोटी दुधाळ जनावरांच्या मर्यादेत प्रत्येकी रु.३०००/- प्रमाणे एकूण रु.९०,०००/- इतकी मदत संबंधित आपदग्रस्तांना देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सदर आगीमुळे एकूण ४५ शेतकऱ्यांचे १८.८३ हे.आर क्षेत्रातील ३३७४ काजू कलम झाडांचे नुकसान झाले असून, त्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आलेला आहे. अहवाल प्राप्त होताच निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.